# Annual Report Submitted by M.E.S INSTITUTE OF MANAGEMENT AND CAREER COURSES

Submitted by :MES AR User (principal.imcc@mespune.in)
Submitted On : 30 Apr, 2024

## 01* प्रस्तावना

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड करिअर कोर्सेस (आय.एम.सी.सी.) ही शाखा गेली ४० वर्षे पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना व्यवस्थापनाचे शिक्षण देत आहे. या सोबतच विद्यार्थ्यांना विविध उपक्रमातून सामाजिक बांधिलकी शिकवून उत्तम प्रतीचे नागरिक घडवण्याचे कार्य ह्या शाखेतर्फे केले जाते.
आमच्या महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व ए.आय.सी.टी.इ मान्यता प्राप्त एम.सी.ए. व एम.बी.ए. अभ्यासक्रम आणि पी एच.डी. संशोधन केंद्र ही चालविले जाते. विद्यादानाच्या क्षेत्रातील सतत होणाऱ्या बदलांबाबत प्राध्यापकांना अवगत ठेवण्यासाठी अनेक प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन येथे केले जाते. आमचे महाविद्यालयास National Assessment and Accreditation Council (NAAC) ची A+ ग्रेड प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड करियर कोर्सेस या महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा दिला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०३३ - ३४ या दहा वर्षांच्या कालावधीसाठी महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा देण्यात आला आहे.

## 02* विशेष उल्लेखनीय कार्यक्रम / उपक्रम (पहिले पाच अनिवार्य आहेत)

### 02.1

दिनांक ०५/१०/२०२३ रोजी इनस्टीटयूट ऑफ मॅनेजमेंट टेक्नोलॉजी, गाझियाबाद येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ.मीनल ओक याना “ MLIBNET National Innovative Librarian Award 2023” या पुरस्काराने सन्मानित केले गेले. या परिषदेचा विषय "Empowering Libraries, Connecting Communities, Innovations, Collaborations and Entrepreneurship" असा होता. या परिषदेत सुमारे ४५७ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मान्यवरांनी सहभाग घेतला.

## 022

महाविद्यालयाच्या एम.सी.ए. विभागा तर्फे " नवोन्मेष" या संगणक प्रकल्प सादरीकरण स्पर्धेचे आयोजन दिनांक २१ ऑक्टोबर, २०२३ रोजी करण्यात आले होते. अनेक प्रकल्पांपैकी निवडक १३ प्रकल्प सादरीकरणासाठी निवडण्यात आले. या स्पर्धेत विविध विषयांवरील प्रकल्प सादर करण्यात आले. तज्ञ मार्गदर्शकांकडून हे प्रकल्प तपासण्यात आले. या मध्ये पीईएस मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, पुणे या संघाला प्रथम पारितोषिक मिळाले. मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, पुणे या संघाला द्वितीय व फर्ग्युसन कॉलेज, पुणे या संघाला तृतीय पारितोषिक मिळाले.

## 023

म.ए.सो.आय.एम.सी.सी.च्या संघाने "सकाळ करंडक" या स्पर्धेत सहभागी होऊन दिनांक २७ ऑक्टोबर, २०२३ रोजी आशयघन अशा "जिना इसी का नाम है " ह्या एकांकिकेचे सादरीकरण केले व मानाचा सकाळ करंडक जिकला आणि रु.५१,०००/- चे प्रथम पारितोषिक मिळवले. या बरोबरच वैयक्तिक अभिनय, प्रकाश योजना, दिग्दर्शन, नेपथ्य ह्या सर्व प्रकारातील पहिली पारितोषिके जिंकली

## 024

महाविद्यालयातील एम.बी.ए. विभागा तर्फे "Pathfinder – Specialization Selection Series" सुरु करण्यात आली. या अंतर्गत विविध व्याख्यान सत्रांचे आयोजन केले जाते. एम.बी.ए.च्या विद्यार्थ्यांसाठी स्पेशलायझेशन निवडणे हा अत्यंत महत्वाचा निर्णय असतो व जो त्यांच्या करीयरवर परिणाम करणारा असतो. याच संदर्भातील मार्गदर्शनासाठी एम.बी.ए. च्या विद्यार्थांसाठी Marketing Specialization, Human Resource Specialization, Finance Specialization, Entrepreneurship Specialization, Operational Specialization & Business Analysis Specialization. प्रत्येक स्पेशलायझेशनमधील तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन केले जाते. सदर ब्याख्यानांचे आयोजन ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही माध्यमातून केले जाते.

## 025

मएसो आय.एम.सी.सी.- एम.सी.ए., एम.बी.ए. विभाग व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये शैक्षणिक क्षेत्रातील अध्यापक,

संशोधक यांच्यासाठी विद्याशाखा विकास कार्यशाळेचे आयोजन AICTE Trainiing & Learning Academy (ATAL) तर्फे करण्यात आले. प्रती दिवशी दोन सत्रात विविध मान्यवरांनी उपस्थित अध्यापक आणि संशोधकांना मार्गदर्शन केले. एम.सी.ए. विद्याशाखे अंतर्गत Blockchain in Education , Artificial Intelligence for Education, Cyber Security and Data Science या विषयांवरील कार्यशाळा घेण्यात आल्या. एम.बी.ए. विद्याशाखे अंतर्गत Technology Management in Education Sector and Future outlook in Mangement through analytics and Technology या विषयांवर कार्यशाळा घेण्यात आल्या.

02.6

महाविद्यालयात दिनांक १० फेब्रुवारी, २०२४ रोजी " जिज्ञासा" ह्या टेक्निकल फेस्टचे आयोजन करण्यात आले होते. आय.एम.सी.सी.तील विद्यार्थ्यांमधील नियोजन, संवाद कौशल्य, सर्जनशीलता, नेतृत्व क्षमता, वेळेचे नियोजन, संघटन कौशल्य इत्यादी गुणांची पारख व विकास व्हावा या उद्देशाने याचे आयोजन प्रतिवर्षी केले जाते. या वर्षी यात विविध प्रकारच्या १० स्पर्धा घेण्यात आल्या व विविध शैक्षणिक संस्थांमधील ८०० स्पर्धकांनी या मध्ये आपला सहभाग नोंदवला. यातील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके वितरण करण्यात आली. या फेस्टमध्ये बिझनेस वॉर, वॅलोरट, फ्लटर शटर, ब्रेन टीजर आणि कोड क्लॅश इत्यादी स्पर्धांचे आयोजन केले गेले.

02.7

म.ए.सो.आय.एम.सी.सी., म ए सो वरिष्ठ महाविद्यालय व रात्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने " Nurturing Innovations in an Organization " या विषयावर दोन दिवसीय परिषदेचे आयोजन दिनांक १५/०२/२०२४ व १६/०२/२०२४ रोजी आय.एम.सी.सी. सभागृहात करण्यात आले. या परिषदेदरम्यान परिसंवादा दरम्यान आयोजित पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेत आय.एम.सी.सी. तील प्रा.डॉ.पूनम वठारकर व विद्यार्थी कु.अथर्व देशपांडे व कु.मधुरा जोशी याना बेस्ट रिसर्च पेपरचे पारितोषिक मिळाले.

## 03 **शाळेने आंतर शालेय स्तरावर किंवा राज्यस्तरावर किंवा राष्ट्रीय स्तरावर केलेली विशेष कामगिरी (पर्यायी)**

आय.एम.सी.सी.च्या संघाने सांस्कृतिक क्षेत्रात मानाच्या मानल्या गेलेल्या " पुरुषोत्तम करंडक " एकांकिका स्पर्धेत सहभाग घेतला. मएसो आय.एम.सी.सी.ने दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ रोजी "

मायबाप ” ह्या एकांकिकेचे सादरीकरण केले. यात कु.साक्षी परदेशी , ऋषभ जैन व अभिषेक लंके ह्या विद्यार्थ्यांनी वैयक्तिक अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. याच एकांकिकेचे सादारीकरण “ श्री.दाजीकाका गाडगीळ करंडक ” व “प्रकाश इनामदार करंडक ” स्पर्धेत अनुक्रमे दिनांक ८ सप्टेंबर, २०२३ रोजी व १ सप्टेंबर, २०२३ रोजी केले गेले यात कु.साक्षी परदेशी ह्या विद्यार्थीनीस वैयक्तिक अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले व कु.ऋषभ जैन ह्या विद्यार्थ्यास अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

मुंबई येथे पार पडलेल्या सवाई करंडक स्पर्धेतेही मएसो आय.एम.सी.सी.च्या संघाने “जिना इसी का नाम है ” ह्या एकांकिकेचे सादरीकरण दिनांक १३ जानेवारी, २०२४ रोजी केले. ह्या वेळी आय.एम.सी.सी.च्या संघातील कु.ओम चव्हाण याने लक्षवेधी अभिनेत्याचे पारितोषिक मिळवले

## 04 आपल्या शाखेची फ्लॅगशिप ॲक्टिव्हिटी

### 04.1

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उद्योगातील संधीसाठी तयार रहावे या हेतूने आय.एम.सी.सी.त विविध क्लब स्थापन करण्यात आले.
कोडींग क्लब – विद्यार्थ्यांनी औद्योगिक क्षेत्रातील विविध बदलांसाठी तयार रहावे व आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी कोडिंग क्लबची सुरुवात करण्यात आली. या क्लब तर्फे विविध तांत्रिक सत्रे,कोडिंग स्पर्धा आणि सॉफ्टवेअर प्रकल्प प्रदर्शानांचे आयोजन करण्यात येते.
फायनान्स क्लब – या क्लबची स्थापना वित्त क्षेत्रातील अलीकडील ट्रेंड आणि घडामोडींच्या शोधाचे वातावरण निर्माण करण्यासाठी केली गेली. या क्लबचे उद्दिष्ट सर्व सदस्यांमध्ये नैतिक पद्धती रुजवणे आणि प्रोत्साहन देणे, ज्ञान वाढवणे, कौशल्य विकास, व्यावसायिक विकास करणे हे आहे.

मार्केटिंग क्लब - मार्केटिंग क्लबचे उद्दिष्ट नवोदित विपणन व्यवस्थापन व्यावसायिकांसाठी परस्पर संवाद आणि व्यावहारिक एक्सपोजरद्वारे ज्ञान आणि कौशल्ये वाढविण्याच्या संधी निर्माण करणे हा आहे. या क्लब द्वारे उद्योग व्यवसायातील तज्ञ लोकांची व्याख्याने / प्रशिक्षण कार्यशाळा यांचे आयोजन केले जाते.

एच आर क्लब - ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट क्लबला "कल्चर बिल्डर्स" असे संबोधले जाते. ह्या कल्बचे मूळ उद्दिष्ट मानव संसाधन व्यवस्थापन क्षेत्रातील विद्यार्थ्यांना चर्चा आणि संवादासाठी एक मंच प्रदान करण्याचे हेतूने करण्यात आली. या द्वारे मानव संसाधन व्यवस्थापन क्षेत्रातील विद्यार्थ्यांची ज्ञानवृद्धी होईल व विद्यार्थ्यांना मानव संसाधन व्यवस्थापन क्षेत्रातील विविध

कौशल्यांचा विकास साधता येईल.

दि बिझनेस ॲनेलीटिक्स - या क्लबचा उद्देश महत्त्वाचा डेटा ओळखण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करणे आणि विश्लेषणात्मक कौशल्ये व व्यवस्थापकीय कौशल्यांच्या ज्ञानाच्या मदतीने व्यवसाय विकासामध्ये त्या डेटाचा उपयोग करून घेण्यासाठी तयार करणे हा आहे.

इ-स्पोर्टस क्लब - ई स्पोर्ट्स अंतर्गत विविध इव्हेंट गेमर्सना व्यावसायिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करण्यात येते. यामुळे गेमिंग उत्साही लोकांमध्ये सौहार्दाची भावना देखील वाढते. ई स्पोर्ट्सला मिळणारे सततचे समर्थन आणि वाढीमुळे, हे स्पष्ट आहे की हा उद्योग जगभर भरभराट करत राहील आणि प्रेक्षकांना मोहित करेल.

दिनांक १७/१०/२०२३ रोजी इनोव्हेशन दिना निमित्त “ सर्वाय ” संस्थेचे संस्थापक डॉ.विशाल सरदेशपांडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन आय.एम्.सी.सी.च्या स्टार्टअप आणि इनोव्हेशन सेल मार्फत करण्यात आले. सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी या व्याख्यानास उपस्थिती नोंदविली.

04.2

औद्योगिक तज्ञ, शैक्षणिक तज्ञ व विद्यार्थी याना परस्परातील दृष्टीकोन समजावून घेण्यास व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी मएसो आय.एम.सी.सी. तर्फे प्रतिवर्षी एच.आर.मिट. चे आयोजन केले जाते. या वर्षी दिनांक १५ मार्च २०२४, रोजी ह्या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. सुमारे २५० तज्ञांचा सहभाग ह्या कार्यक्रमात होता. ह्या कार्यक्रमातील चर्चासत्रात सर्व सहभागी तज्ञामध्ये Future of Corporate- Opening the doors to Generation Z या विषयावर विस्तृत चर्चा झाली व वैचारिक आदान-प्रदान झाले.

## 05 वर्षभरात प्रत्यक्ष अथवा ऑनलाईन पद्धतीने झालेल्या माजी विद्यार्थी मेळाव्यांची माहिती

दिनांक १६/०९/२०२३ रोजी “ ऋणानुबंध – माजी विद्यार्थी मिळावा ” म.ए.सो.आय.एम.सी.सी. मध्ये संपन्न झाला. आय.एम.सी.सी.च्या अनेक माजी विद्यार्थ्यांनी आय.एम.सी.सी.च्या नवीन वास्तुस भेट देऊन मा.संचालक व शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांस शुभेच्छा दिल्या. या मेळाव्यात अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपले सहाध्यायी मित्र / मैत्रिणी व शिक्षक यांच्या समवेत गतस्मृतींस उजाळा दिला व पुन:पुन्हा भेटण्याच्या अपेक्षेसह निरोप घेतला.

या दिवशी माजी विद्यार्थी मेळाव्याचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन आय.एम.सी.सी.

व दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाची रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. एकूण ८८ पिशव्यांचे संकलन करण्यात आले.

## 06 इतर शाळांशी वा संस्थांशी झालेल्या एम. ओ.यु. किंवा सहकार्य करारांची माहिती

आय.एम.सी.सी.ने खालील संस्थांशी सामंजस्य करार केले आहेत.
व्हेरीटास, हर्बिंजर सिस्टिम्स, लाईफ ट्रान्स्फोर्मरस, दे आसरा फाउंडेशन, इंडिअन रेड क्रॉस सोसायटी, हिरकणी फौंडेशन, पुणे मॅनेजमेंट आसोसिएशन (पी.एम.ए.), सौ.बाया कर्वे वूमन्स स्टडी अँन्ड रिसर्च सेंटर, बिझनेस एथिक्स फाउंडेशन
लाईफ ट्रान्स्फोर्मरस या संस्थेतर्फे महाविद्यालयातील एम.बी.ए. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी " पर्सनल ग्रुमिंग " कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.
इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने महाविद्यालयात दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजी माहितीप्रद कायक्रम घेण्यात आला. श्री.रमेश कुलकर्णी, सचिव, इंडिअन रेडक्रॉस सोसायटी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना रेडक्रॉस सोसायटी व त्यांच्या द्वारे चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.
दे आसरा फाउंडेशनच्या वतीने " Lead-in Inspire Understanding Entrepreneurship as a mindset " या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.
बिझनेस एथिक्स फाउंडेशन व माहाविद्याल्याच्या संतुक्त विद्यमाने बिझनेस एटिकेट्स या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.
व्हेरीटासतर्फे एम.सी.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी Selinium Tool वरील प्रशिक्षण सत्राचे आयोजन व त्या सोबतच Quality Assurance ह्या विषयावरील माहिती सत्राचे आयोजन करण्यात आले.

## 07 शाळेची शैक्षणिक , सामाजिक , क्रीडाविषयक , सांस्कृतिक वाटचाल दर्शकबाबी

' नोड जे.एस.' ह्या विषयाच्या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयातील एम.सी.ए.च्या संगणक प्रयोगशाळेत करण्यात आले. श्री.औदुंबर कबडे, बीयू – हेड, ट्रेनिंग व डेव्हलपमेंट, औटफ्लो टेक्नोलॉजीज प्रा.लि. यांनी या कार्यशाळेत सदर विषयाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले. आय.एम.सी.सी.तील १४५ विद्यार्थ्यांनी सदर प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

महाविद्यालयातील एम.बी.ए. अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी गुजरात मधील विविध उद्योगांच्या भेटींसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते. याचे आयोजन विद्यार्थ्यांना व्यवस्थापन क्षेत्रातील, औद्योगिक क्षेत्रातील, ग्रामीण विकासातील विविध पैलू दृष्टीगोचर व्हावेत या हेतूने करण्यात आले होते यात Indian Institute of Management (IIM), Ahmedabad,

Entrepreneurship Development Institute of India, Ahmadabad ह्या शैक्षणिक क्षेत्रातील व Amul India Ltd व Institute of Rural Development हयां संस्थांचा समावेश होता. ह्या शैक्षणिक सहलीतून विद्यार्थ्यांना अनेक शैक्षणिक व उद्योजकतेच्या विविध टप्प्यांविषयी सखोल माहितीची प्राप्ती झाली.

आय.एम.सी.सी. व पूर्णंम इकोव्हीजन या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सव कालावधीत गणेशमूर्ती संकलानाचा कार्यक्रम घेण्यात आला. गणेशमूर्तीच्या विसर्जनाने होणाऱ्या जल प्रदूषणाबाबत समाजातील सर्व घटकांना माहिती देणे व त्याद्वारे होणारे जलप्रदूषण रोखणे हा या कार्यक्रमाचा मूळ उद्देश होता.
शिक्षक दिनाचे औचित्य साधून एम.बी.ए. अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी गो-ग्रीन @ वर्क प्लेस ह्या उपक्रमाचे आयोजन केले. त्यांनी आय.एम.सी.सी.तील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना झाडांची रोपे देऊन वातावरण शुद्धीसाठी त्याचा कसा उपयोग होतो हे सांगितले.

प्रतिवर्षी प्रमाणे आय.एम.सी.सी.मध्ये ‘इंद्रधनू’ ह्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी करण्यात आले. त्यात आय.एम.सी.सी.तील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. ‘इंद्रधनू’ ह्या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालया तर्फे विविध क्रीडा प्रकारांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात इनडोर क्रीडाप्रकारात टेबल टेनिस, बॅडमिंटन, कॅरम,चेस या सारख्या खेळांचा व आउट डोअर क्रीडाप्रकारात क्रिकेट व व्हॉलीबॉल या क्रीडाप्रकारातील स्पर्धेचा समावेश होता. माहाविद्याल्यातील विद्यार्थ्यांनी या सर्व क्रीडाप्रकारांत आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ह्या संमेलनात विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रमात आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले.

**Images with captions**






"संस्थेतील नवकल्पनांचे पोषण" (ICNIO 2024) या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद

“ इंद्रधनू २०२४ ” मधील काही संस्मरणीय क्षण







एच आर मिट २०२४

आय.आय.एम, अहमदाबाद, गुजराथ या संस्थेस आय.एम.सी.सी.मधील विद्यार्थी व शिक्षकांची भेट







इनोव्हेशन डे सेलिब्रेशन 2024

फायनान्स क्लब



प्रो.डॉ.मीनल ओक (Librarian -Prof Level 14) MANLIBNET National Innovative Librarian Award 2023 पुरस्कार स्वीकारताना



श्री.महेश मांजरेकर व डॉ.गिरीश ओक ह्यांचेसह सकाळ करंडक विजेता आय.एम.सी.सी.चा संघ २०२४.